# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०१४

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. १ फेब्रुवारी, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०१४ चा निकाल दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडे सादर केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. या तपासणीनुसार अपात्र ठरणा-या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रदद करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी. मुख्य परीक्षा दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी घेण्यात येईल.**

**३.** प्रस्तुत निकाला आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. त्यावेळी **उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पदधतीने अर्ज व परीक्षाशुल्क विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील**. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**४. विशेष मागास प्रवर्ग-अ** (SBC-A) **या प्रवर्गाच्या आरक्षणासंदर्भातील दि. २४ जुलै, २०१४ रोजीचा शासन निर्णय दिनांक २ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द झाल्याने प्रस्तुत प्रकरणी उक्त प्रवर्गाची आरक्षित ६ पदे समांतर आरक्षण विचारात घेऊन अमागास प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली आहेत. परंतु सदर प्रवर्गाकरिता आरक्षित पदासंदर्भातील शासनाचे अंतिम अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने अंतिम निकालाच्या वेळी आवश्यकती कार्यवाही करण्यात येईल.**

**विजया पडते**
उप सचिव (परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

दि. ४ जुलै, २०१५